P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Summative Written Test - II (2024-25)

## Standard - V

**Subject - MARATHI** | **Marks - 40**
**Date - 02/04/2025** | **Time : 1.00 to 3.30 pm**

**प्रश्न १ खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा. (३)**

मलण्णा शेतावरून घरी आला. त्याने दोन्ही बैलांना गोठ्यात बांधले. त्यांना चारा, पाणी दिले. हात-पाय धुऊन तो घरात गेला. त्याची पत्नी मालती हिने भाजीभाकरी केली होती. दोघांनी जेवण केले.

**प्रश्न-**

१. मलण्णा कोठून घरी आला ?

२. मलण्णाने बैलांना कोठे बांधले ?

३. मालतीने जेवण काय बनवले होते ?

**प्रश्न २ अ) एक वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही २) (२)**

१. नदीच्या पाण्यावर काय तयार करतात ?

२. मधमाशी कोठे चालली होती ?

३. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर कोणते कार्य केले ?

४. घरची सगळी कामे कोण करते ?

**प्रश्न २ ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणताही १) (२)**

१. दामूकाकांचा प्रामाणिकपणा कसा दिसून आला ?

२. मालतीने युक्ती करायचे का ठरवले ?

३. आईचे हात कशामुळे लालेलाल झाले होते ?

**प्रश्न ३ अ) खालील वाक्ये कोण-कोणास म्हणाले ते लिहा (कोणतेही ३) (३)**

१. ''अगं आई, किती जड आहे पिशवी !''

२. ''रेश्मा, हे बघ पत्र ! काकांनी पाठवलं आहे.''

३. ''अरे मध गोळा करायला''

४. ''काय रे बाबा ? कपडे आणलेस का ?''

**प्रश्न ३ ब) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा. (३)**

(धार्मिक, सहभोजन, सागराला)

१. आम्ही ______________ केले.

२. शेवटी मी ______________ जाऊन मिळते.

३. त्याचे वडील ______________ वृत्तीचे होते.

**प्रश्न ४ अ) खालील कविता वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. (३)**

पतंग उडवू चला,
गड्यांनो, पतंग उडवू चला.
रंग ढगांवर मावळतीचा,
लाल पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजूस डोंगरमळा.

करू चला सुरवात बरोबर,
सोडा सोडा रीळ भराभर,
पतंग चढवा हे वाऱ्यावर,
ढगांस भेटायला.

मउमउ वाळुत पाय रोवुनी,
देऊ झटका दोर ओढुनि,
पतंग जातिल वर वर चढुनी,
पंख नको त्याजला.

जशी पाखरे आभाळात,
पंख पसरूनी तरंगतात,
दिसतिल तैसे पतंग रंगित,
खेळ किती चांगला!

**कवी – अ. ज्ञा. पुराणिक**

**प्रश्न-** १. मुले काय उडवत आहेत?

२. पतंग कोणाला भेटायला वाऱ्यावर चढत आहेत?

३. कवितेचे कवी कोण आहेत?

**प्रश्न ४ अ) कवितेवर आधारित खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) (३)**

१. झुळझुळ वारा कोठे वाहत आहे?

२. उद्याला कोण मोठे होणार आहे?

३. पतंग कोणासारखे तरंगतात?

४. सुंदर बागा कोठे तयार होणार आहेत?

**प्रश्न ४ ब) खालील प्रश्नांचे थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही १)** **(२)**

१. छोटेसे बहीणभाऊ मोकळ्या आभाळी जाऊन काय करणार आहेत?

२. मुले पतंग कसे उडवणार आहेत?

**प्रश्न ५ अ) खालील समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.** **(२)**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| गाव | थकणे |
| सुंदर | खेडे |
| दमणे | सुरेख |
| कुटुंब | परिवार |

**ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)** **(२)**

१. वाळलेले X

३. ऊन X

२. एक X

४. हलके X

**प्रश्न ५ क) खालील शब्दांचे वचन बदला. (कोणतेही २)** **(२)**

१. पाखरू –

३. पैसा –

२. बैल –

४. काम –

**प्रश्न ५ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. (कोणतेही २)** **(२)**

१. चिमणा –

३. आजोबा –

२. वडील –

४. शिक्षक –

**प्रश्न ६ अ) खालील अक्षरे अंकात लिहा. (कोणतेही २)** **(२)**

१. पंच्याहत्तर –

३. नव्वद –

२. ऐंशी –

४. सत्याण्णव –

**प्रश्न ६ ब) खालील वाक्यातील नाम व सर्वनाम ओळखून लिहा. (कोणतेही २)** **(२)**

१. ती साक्षीच्या घरी गेली.

नाम – ____________________ सर्वनाम – ____________________

२. त्याने सागरला हाक मारली.

नाम – ______________________ सर्वनाम – ______________________

३. आईने त्यांना बोलवले.

नाम – ______________________ सर्वनाम – ______________________

**प्रश्न ६ क) खालील वाक्यातील विशेषण व क्रियापद ओळखून लिहा (कोणतेही २) (२)**

१. ते झाड उंच आहे

विशेषण – क्रियापद –

२. आंबा फळांचा राजा आहे.

विशेषण – क्रियापद –

३. पाऊस मुसळधार पडत होता.

विशेषण – क्रियापद –

**प्रश्न ६ ड) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही १) (१)**

१. दामू पैसे बरोबर आहेत तुझा प्रामाणिकपणा मला आवडला

२. आई तू दर महिन्याला एवढं ओझं एकटीच घेऊन येतेस

३. बाई याला आमराई का म्हणायचे

**प्रश्न ७ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहून गोष्ट पूर्ण करा. (४)**

**प्रामाणिक लाकूडतोड्या**

(नदीत, लाकूडतोड्या, दया, चांदीची, प्रामाणिकपणा, त्याचीच, रडू, बक्षीस)

एक होता __________ . एकदा त्याची कुऱ्हाड __________ पडली. तो __________ लागला. वनदेवीला त्याची __________ आली. तिने नदीतून सोन्याची कुऱ्हाड काढली आणि त्याला दिली. त्याने ती घेतली नाही. वनदेवीने त्याला __________ कुऱ्हाड दिली. त्याने तीही कुऱ्हाड घेतली नाही. मग वनदेवीने त्याला लोखंडाची कुऱ्हाड दिली. ती __________ होती. त्याने आनंदाने घेतली. वनदेवीला लाकूडतोड्याचा __________ आवडला. तिने त्याला तिनही कुऱ्हाडी __________ दिल्या.

■■■